# ईसीई इंडिया एनर्जीला मिळाला म्यॅन्युफॅक्चरींगसाठी पुरस्कार

अमरावती दि. २८ : २१ जून २०२३ रोजी अहमदाबाद, गुजरात येथे सूर्यकॉन अहमदाबाद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. इक्यू इंटरनॅशनलने या परिषदेचे आयोजन केले होते. अमरावती येथील उद्योन्मुख सौरउत्पादन कंपनी ECE India Energies च्या विभागाचे संचालक अनिकेत तोंडरे यांनी आपल्या गुजरात प्रांताचे सेल्स मॅनेजर श्री हेमंत कालवानी यांच्यासह या परिषदेत सहभाग घेतला. या परिषदेत श्री अनिकेत तोंडरे यांनी तंत्रज्ञान, उत्पादन




आणि ईपीसी या विषयावर आपले विचार मांडले. श्री अनिकेत यांच्या मते, त्यांची कंपनी ईसीई इंडिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अक्षय ऊर्जा क्षेत्रात आगामी काळात मध्य भारतातील सर्वात मोठी उत्पादन कंपनी बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

अहमदाबाद, गुजरात येथे झालेल्या या सूर्यकॉन परिषदेत ईसीई इंडिया कंपनीला गुजरात एनुअल सोलर अवार्ड २०२३ च्या अंतर्गत Most Emerging -nd Rising Star Company In Solar Panel Manufacturing पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री अनिकेत यांच्या मते त्यांच्या कंपनीला हा पुरस्कार मिळणे ही अतिशय अभिमानाची बाब आहे. हा पुरस्कार सौरऊर्जेच्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या उद्योजकांना दिला जातो. या परिषदेदरम्यान ईसीई इंडियासह एकूण ३५ सौर ऊर्जा संबंधित संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. संमेलनादरम्यान या सर्वांना आपले मनोगत सादर करण्याची संधी मिळाली.